# लाईफ, जिंदगी, जीवन

## आज आहे, उद्या नाही...




पवन अनिल सोनवणे

# लाइफ, जिंदगी, जीवन

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# लाइफ, जिंदगी, जीवन

लेखक

पवन अनिल सोनवणे

# लाइफ, जिंदगी, जीवन

## लेखक... पवन अनिल सोनवणे

फोन नंबर - +९१ ८९७५१८४१३७
ईमेल – pawansonawane969@gmail.com
पत्ता- प्लॉट नं-८७, स्वामी विहार, जळगाव रोड, भुसावळ.(४२५२०१)
जि.जळगाव

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान



www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841



**प्रकाशन : ३० सप्टेंबर २०२०**



©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# मनोगत



नमस्कार मी पवन, ई साहित्यावरील माझे हे पहिले पुस्तक.

आताच्या चालू वर्षात म्हणजेच २०२० मध्ये जीवन अगदी कवडीमोल झाल्याचे बघावयास मिळत आहे. कोरोना ह्या जीवघेण्या विषाणूमुळे खूप जण ह्या मानवी जीवनास पारखे होत आहेत. मरण पावणाऱ्या लोकांच्या नशिबी साधे अंत्यसंस्कार पण नाही, ना की त्यांच्या नातेवाईकांकरता त्यांचं अंतिम दर्शन.

"**जीवन**" आहे तो वर जगून घ्या, हे सांगणारे हे पुस्तक. जीवन जगण्यासाठी जीवन म्हणजे काय? हे समजणे महत्वाचे आहे. त्याबरोबरीलाच जीवनाचे विविध पैलू उलगडतांना अत्यंत आनंद होत आहे. दुसऱ्यांसाठी जीवन अर्पण करता करता स्वतः मात्र जीवन जगायला विसरलो, असे होता कामा नये. खूप वेळेस आईवडील आपलं अख्खं आयुष्य मुलांचे जीवन सार्थ बनविण्यास खर्ची घालतात, पण स्वतः मात्र जीवनाचा आस्वाद घेण्यास अपुरे पडतात.

मानव जन्म लाभलाय तर त्याचा पुरेपूर आनंद घेत, या भूतलावर आपली छाप मरणोप्रांत सोडत काहीतरी करून जगावे. जन्म मृत्युचा संगम एका पुस्तकरूपी माळेत गुंफण्याचा एक छोटासा प्रयत्न. पुस्तकातील प्रत्येक घटकाची कुठे ना कुठे आपल्या जीवनाशी सांगड घालत त्याचा आस्वाद घेताना पुढील जीवन कसे सुखकर होईल याचा प्रयत्न करणे तसेच मानवाचा जन्म पुन्हा नाही म्हणून आजचा जीवन आनंदात जगणे बरं नव्हे का....

"जेव्हा एक बीज काळोखाच्या अंधारातून कठोर जमिनीतून मार्ग काढत उगवू शकते तर तुम्ही का नाही?" या उक्तीप्रमाणे अत्यंत खडतर प्रसंगाला सामोरे जाऊन त्यातून बोध घेऊन नवचैतन्याची व नवनिर्मितीचा ध्यास घेत जीवन जगावे.

"ई साहित्य प्रतिष्ठान" नावाचा वटवृक्ष त्याच्या प्रच्छायेसाठी आम्हाला उपलब्ध करून देणाऱ्या सुनील सामंत सर आणि टीम चे मनस्वी आभार..

पवन अनिल सोनवणे

# परिचय

लेखकाचे नाव- पवन अनिल सोनवणे

फोन नंबर - +९१ ८९७५१८४१३७

ईमेल – pawansonawane969@gmail.com

पत्ता- प्लॉट नं-८७, स्वामी विहार, जळगाव रोड, भुसावळ.(४२५२०१) जि.जळगाव

शिक्षण – **BE Mechanical Engineering**. सध्या **MBA- FINANCE MANAGEMENT** च्या अंतिम वर्षाला आहे. लवकरच कॉर्पोरेट जीवनात प्रवेश करणार आहे. सोबतीला लिखाणाची व वाचनाची आवड खूप आहे. लिखाण केलेलं आहे पण व्यासपीठ मिळत नव्हते. ई-साहित्य च्या रूपाने एवढं मोठं व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम चे आभार. दोन्ही इंग्रजी आणि मराठी भाषेतील काल्पनिक तसेच ऐतिहासिक पुस्तके यांची आवड. “लाइफ जिंदगी जीवन भाग २” चे लिखाण सुरू आहे. लवकरच ई- साहित्य वर प्रकाशित करण्याबद्दल प्रयत्नशील आहे.

# अर्पणपत्रिका

अर्थातच मानव जन्म घेऊन ह्या सुंदर अश्या

जगात जीवन व्यतीत करणाऱ्या सर्व मानव मित्रांना...

# लाईफ, जिंदगी, जीवन

## आज आहे, उद्या नाही…

# अस्वीकरण

प्रस्तुत पुस्तकातील सर्व पात्र, घटना, स्थळ हे काल्पनिक असून त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# अनुक्रमणिका




१. जीवन काय आहे?

२. जीवन जगावं कसं?

३. आई आणि वृद्धाश्रम

४. जीवनातील व्यसन आणि वळण

५. जीवन गरीबाचं आणि लाइफ श्रीमंताची

६. प्रेम : तारतं की मारतं

७. जीवन आणि बिछाना

८. जन्माचा जल्लोष आणि मृत्युचा आक्रोश

# जीवन काय आहे?

जीवन एक संघर्ष आहे प्रत्येक सजीवाचा दैनंदिन कार्य पूर्ण करण्याचा, धडपडण्याचा, पडला तर त्यातून सावरून उठून पुन्हा उभे राहण्याचा, पुन्हा जोमाने कामाला लागण्याचा, हाती घेतलेलं ते काम यशस्वीपणे पूर्ण करण्याचा, सर्वांना सोबत घेऊन चालण्याचा, आपल्या सोबत असणाऱ्याचा विचार करत जगण्याचा आणि मरणाला हरवण्याचा.

जीवन एक प्रक्रिया आहे ज्यात संघर्ष जन्मापासून चालू होतो तर शेवट मृत्यूपर्यंत येऊन थांबतो. आजघडीला मानवी जीवन सरासरी ६८ वर्ष इतके आहे. त्यात खूप सारा वेळ हा काहीतरी शिकून घेण्यातच जातो. ह्या मिळालेल्या मानव जन्मात केला तर सर्व ताळमेळ आहे नाहीतर एक व्यर्थ खेळ आहे. एक काल्पनिक गोष्ट सत्यात उतरवण्याची एक कसोटी म्हणजे जीवन आहे. दररोज स्वतःला दुसऱ्या दिवसाचा सूर्य बघण्यासाठीची परिस्थितीशी दिलेली एक झुंज ज्यात थांबला तो संपला आणि जगला तो तारला अस समजून परिस्थितीवर केलेली मात तसेच हा मानव जन्म पुन्हा नाही, हा देह पुन्हा नाही अस समजून मिळालेल्या संधीचं केलेलं सोनं म्हणजे जीवन होय.

जीवन एक चक्र आहे ज्यात खूपसारे चढ उतार येतील, दररोज मृत्यू डोळ्यासमोर जाईल ,पण त्याला न घाबरता त्यासमोर

छातीठोकपणे सामोरे जाणे, आपल्याजवळ हे नाही ते नाही याचं रडगाणे गात बसण्यापेक्षा आपला उद्याचा दिवस कसा असेल याचे चित्र डोळ्यासमोर रंगवत बसवून कृती करण्याचा ध्यास आपल्याला जीवन जगण्याचा एक आशेचा किरण देऊन जातो.

जीवन हा भावनांचा एक पुंजका आहे, ज्यात खूप साऱ्या भावना उफाळून येतात. मुक्या प्राण्याला सुद्धा भावना असतात हे त्यांच्या वर्तवणूकीवरून दिसून येतं जसे की कुत्रा, एक ईमानदार प्राणी, ज्याला तुम्ही आज भरवलं तर तो जन्मभर आपली साथ सोडत नाही पण याउलट माणसाचं आहे तुम्ही आज त्याला साथ दिली तर तो दुसरं कोणी भेटताच आपल्याला विसरून जातो. जीवन एक भीती आहे, मरणाची, हरण्याची, पडण्याची, जगण्याची, कोणाला तरी गमावण्याची, धडपडण्याची. या भितीवर ज्याने मात केली तो जीवनाची लढाई जिंकला असं आपण म्हणू शकतो.

माणूस सर्व भावना मनात दडपून चालणारा, परिस्थितीशी झगडून व्यक्त होणारा, उद्याचा सूर्य नवी उमेद घेऊन येईल अशी आशा बाळगणारा, उराशी खूप सारे स्वप्न घेऊन विचार करणारा, आपल्या पोटापेक्षा आपल्या पिल्लांच्या पोटाची, त्यांच्या भविष्याची चिंता करत सतत चिंतातुर असणारा एक देह आहे. वयात आल्यापासुन, जबाबदारीचं ओझं डोक्यावर पडल्यापासून, आई वडिलांसोबत

बायकापोरांचा सांभाळ करत स्वतःच्या स्वप्नांची आहुती देत ते मृत्यू शय्येवर पडेपर्यंत सर्व गोळाबेरीज करणारा देह होय.

जीवन जास्त काही नाही तर एक कोरी वही आहे, ज्यात वरील पृष्ठे आई वडील आहेत जे त्यांच्या लेकरूला तारुण्यावस्थेपर्यंत जिवापाड जपत असतात. एकदाचा का तो समंजस झाला तर त्या जीवनरूपी कोऱ्या वहीच्या पानांवर आपल्या मर्जीप्रमाणे लिखाण करत असतो. तर ते लिखाण कसं असावं याचं संपूर्ण स्वातंत्र्य त्या लेखकाला असतं. आपण काय केलं तर आपलं उर्वरित जीवन सुखकर होईल आणि काय वाईटसाईट गोष्टी केल्या तर जीवनात अडथळे येतील याचा सर्वस्वी अधिकार तो जीवन अनुभवणाऱ्यावर अवलंबून असतं.

**‘मरावे परि किर्तीरूपी उरावे’** या उक्तीचा अर्थ असा आहे की जीवन कसेही जगा पण मेल्यानंतर सुद्धा या भूतलावर तुमचं नाव राहील असं तुम्ही काहीतरी चांगलं करून मेला आहात, तुमचं अनुसरण पुढच्या पिढीनेसुद्धा करावं ही भावना मनात असली पाहिजे.

# जीवन जगावं कसं?

आपण पाहिलं की जीवन म्हणजे काय?. आपल्याला लगेच प्रश्न पडेल की हे जीवन जगावं तरी कसं?...

उत्तर अगदी सोपं आहे. जीवन जगतांना होत गेलेल्या चुका सुधारून त्या पुन्हा न करण्याच्या अटीवर आणि नवचैतन्याचा व नवनिर्मितीचा ध्यास घेत, आपला आजचा दिवस कालपेक्षा अधिक बेहतर कसा होईल आणि आजपेक्षा येणारा उद्या कसा चांगला व्यतीत करता येईल याची स्वप्ने रंगवत जीवन जगावे.

एक छोटसं उदाहरण आहे. आपल्याकडे जुन्या काळातील ब्लॅक अँड व्हाइट टीव्ही असायचा. त्याला एक अँटैना लावलेला असायचा. त्या टीव्हीवर दूरदर्शन हे एकच चॅनल लागायचे. आपण ते सर्व आनंदाने पाहायचो. काळ लोटत गेला, टीव्ही जुना झाला. नवीन रंगीत टीव्ही घ्यायला पैसे नसायचे. तो जुना टीव्ही खर्र-खर्र आवाज करायचा, एकदम बारीक बारीक मुंग्या आल्यासारखं चित्र दिसायचे. आपण त्या टीव्हीला एक फटका द्यायचो आणि चित्र स्पष्ट व्हायचे आणि आपण टीव्ही बघायचो.

वरील उदाहरणाची आपल्या जीवनाशी तुलना केली असता आपल्या असं लक्षात येईल की जुना टीव्ही म्हणजे आपलं जीवन आहे, त्याला येणाऱ्या मुंग्या, होणारी खर्र-खर्र म्हणजे जीवनातील चढउतार आहेत आणि दिलेला फटका म्हणजे त्या चढउतारातून सावरलेलो

आपण आहोत. जीवन असे खूप प्रसंग येतात, एकतर ते खूप काही घेऊन जातात किंवा जीवन जगण्याचा एक नवीन मार्ग देऊन जातात.

एका सोप्या भाषेत, जीवन हे सभोवतालच्या गोष्टींचं केलेलं निरीक्षण आहे. त्या निरीक्षणावरून शिकत जाऊन जीवन जगायचं असते. सभोवतालचे वातावरण जसे असते ना तसा माणूस घडत जातो. लहानपणापासूनच जर चांगली संगत मिळाली तर माणसाचे विचार पण तसेच शुद्ध असतात, आणि जर संगतच जर वाईट असेल तर तो माणूस सुद्धा वाईट प्रवृत्तीचा, खून, मारामाऱ्या यात रस असणारा असतो. परिणामतः त्याची पुढची पिढी देखील त्याचेच अनुकरण करते. माणूस हा एक सामाजिक प्राणी आहे. समाज हा घटक त्यावर खूप प्रभाव टाकतो. इथे समाज म्हणजे जातपात नव्हे, तर समाज म्हणजे त्या माणसाच्या आजूबाजूला असलेली माणसे, त्यांची वर्तणूक, त्यांचा एकमेकांबद्दल असलेला आदर, आपुलकी, जिव्हाळा होय. माणूस जश्या समाजामध्ये राहतो त्याची वैचारिक पातळी देखील तशीच असते. मान्य आहे की आपली पुरुषप्रधान संस्कृती आहे, पण जर एक पुरूष घरी आपल्या बायकोला मारहाण करीत असेल, तिला फक्त चूल आणि मूल येवढचं मर्यादित ठेवत असेल, तर त्याचा मित्र, त्याचे आजूबाजूचे देखील तसेच वर्तन करतात. याउलट जर एखादा पुरूष घरी बायकोला सन्मानाने वागवत असेल तर त्याच चांगलं अनुकरण दुसरे देखील करतात.

जीवन जगावे कसे? तर म्हणजे माणसाने व्यसनाधीन होऊन जगावे. आता प्रश्न पडेल की व्यसनाधीन म्हणजे नेमका कसा? तर आपल्याला व्यसन म्हटलं की फक्त वाईट गोष्टी डोळ्यासमोर येतात, पण तसे काही नाही आहे. व्यसनाचे दोन प्रकार असतात. एक म्हणजे चांगले व्यसन आणि दुसरे म्हणजे वाईट व्यसन. चांगल्या व्यसनात व्यायाम करणे, बौद्धिक आणि मैदानी खेळ खेळणे, छंद जोपासणे, वाद्य वाजवणे, सामाजिक कार्य करणे, झाडे लावणे इत्यादींचा समावेश होतो. तर ह्या अश्या चांगल्या व्यसनाची आस धरून जीवन सुखकर करून आनंदाने जगता येईल.

जीवन जगण्याला पंख गरुडाचे, चपळता चित्त्याची, सहनशीलता हिमालयासारख्या उत्तुंग पर्वताची, आक्रमकता एखाद्या खवळलेल्या समुद्राची, मायेची ऊब सूर्याची, शीतलता चंद्राची, तहान एखाद्या तहानलेल्या वाटसरूची, भूक खूप दिवस शिकार न मिळालेल्या जंगली श्वापदाची, रस्ता दाखवणाऱ्या मित्राची, डोक्यावर सतत हात असणाऱ्या आईवडिलांची एवढं सारे पुरेसे आहे. माणसाने जीवन जगायला शिकले पाहिजे. योग्य वेळी योग्य निर्णय घेऊन प्रत्येक क्षण उपभोगला पाहिजे. "जन्माला आला हेला आणि ओझी वाहता वाहता मेला." असे होता कामा नये.

एखाद्या ध्येयाने झपाटलेल्यासारखं, जिद्दीने पेटून उठलेल्यासारखं, आणि आलेल्या परिस्तिथीशी झुंजल्यासारखं जीवन प्रत्येकाने जगायला हवं...

# आई आणि वृद्धाश्रम

आई म्हणजे काय?

आई घराचं मांगल्य असतं. घराला घरपण देणारी आई असते. तुम्ही लहान असो वा मोठे, घरात पाऊल टाकल्याबरोबर तुमचा प्रश्न असतो, ‘आई कुठे आहे?’ ती जराशी का नजरेआड होईना, मन बेचैन होतं, जीव कासावीस होतो. ९ महीने पोटात वागवण्यापासून ते तुम्ही पायावर चालू लागेपर्यंत, तुम्ही बोलू लागल्यापासून ते तिला उलट उत्तर देईपर्यंत, तुमच्या जन्मापासून तर तिच्या मृत्यूपर्यंत खूप काही सोसत, खूप हालअपेष्टा सहन करत, ती लाडाने, प्रेमाने आपल्या पोटच्या गोळ्याला वाढवते आणि तिचे हातपाय गळायला लागल्यावर, ती वृद्ध झाल्यावर तिच्या पोटच्या मॉडर्न मुलाचे पाय तिची घरात अडगळ होते याकरणास्तव वृद्धाश्रमाकडे वळतात. हे जीवन पण किती भारी वळण घेतं ना!

ही एक गोष्ट आहे एका दुर्भागी, थकलेल्या, जीर्ण झालेल्या आईची.

आईच्या माहेरची परिस्थिती हलाखीची असते. ती ऐन तारुण्यावस्थेत आली असता तीचं लग्न लाऊन देण्यात येतं. तीचं जरी लग्न झालेलं असलं तरी ती, संसाररूपी जबाबदारी पेलण्यात असमर्थ असते. कारण तीचं वय नसतं अजून, असेल ती जेमतेम १५-१६

वर्षाची. सासरचा परिवार मोठा असतो. पण वाटणी झाली असल्याकारणाने आईच्या वाटेवर एक छोटसं २-३ खोल्यांचं घर आणि अंथरुणाला खिळलेली सासूबाई येते. नवरा चांगल्या पगारावर नोकरीला असतो तर माहेरसारखी पैश्याची चणचण जाणवत नाही. आईला सावरत सावरत सासुला सांभाळत ७-८ वर्षे ओलांडतात. त्यातच तिच्या पदरी ४ मूलं पडतात. त्यात २ मुले आणि २ मुली असतात. एक जबाबदार सून आता आई झालेली असते. ती आई, पत्नी आणि सून अश्या तिहेरी भूमिका अत्यंत चोखपणे पार पडत असते. ४ मुलांना सांभाळून पण कुटुंबाला आर्थिक हातभार लाभवा म्हणून शिवण काम करत असते. सोबतच शेळीपालन आणि गोपालन यांचा जोडधंदा असतो. आपली कामगिरी आई अगदी लीलयापद्धतीने पार पडत असते. अश्यातच आईच्या सासूबाई मरण पावतात. आईने अंथरुणाला खिळलेल्या सासूची पोटच्या मुलीप्रमाणे सेवा केलेली असते. तिच्या जेवणापासून तर तिच्या मलमूत्रापर्यंत सर्व काही आईने केलेलं असते आणि याला तिचे ४ मुलं आणि नवरा साक्ष असतात.

आईच्या मुली लग्नाच्या होतात. पण दुर्दैवाने तिच्या दोन्ही मुलींच्या सासरची परिस्थिती एकदम हलाखीची असते. आई अजून जोमाने कामाला लागते. तिचं शिवणकाम वाढवते. शेळी आणि गायी यांची पण संख्या वाढलेली असते. त्यातील पूर्ण वाढ झालेल्यांची विक्री करून ते पैसे मिळवतात. अश्या रीतीने ती मुलींचं घर पण इथूनच भागवत असते. ४-५ वर्षे ओलांडतात. मुलींचा संसार सुखकर होतो.

मोठा मुलगा चांगल्या पगाराच्या नोकरीला लागलेला असतो. लहान मुलाचे शिक्षण पूर्ण झालेलं असतं. तो पण नोकरीच्या शोधात असतो. आईला हायसं वाटतं. तिला सार्थक झाल्याचं वाटतं.

पण नशिबात मात्र वेगळचं लिहलेलं असतं. आईच्या लहान मुलाच्या नोकरीचा अजून काही थांगपत्ता नसतो. तो वाईट मार्गाला लागतो. त्याला दारू, सट्टा, गांजा, अंमली पदार्थ यांचं व्यसन लागते. तो नशेमध्ये झिंग राहायला लागतो. त्याला मोठा भाऊ, आईवडील, दोन्ही बहिणी, दोन्ही भाऊजी खूप समजावतात. पण तो त्यांचं काही ऐकत नाही. 'सुटेल ते व्यसन कुठलं!' त्यातच त्या लहान मुलाला कर्करोग होतो. त्याला वाचवण्यासाठी आई प्रयत्नांची पराकाष्ठा करते, खूप पैसा खर्च करते, पण सगळं व्यर्थ. तो मुलगा दवाखान्यात असतानाचं मरण पावतो. आईवर आणि कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळतो. आई सावरते त्यातून.

काही वर्षांनंतर मोठ्या मुलाचे एका सधन कुटुंबातील मुलीसोबत लग्न लाऊन देते. सूनबाई पण चांगल्या पगाराची नोकरी करत असते. मोठा मुलगा नोकरीच्या ठिकाणी असतो. आईचा नवरा सेवानिवृत्त होतो. दोघेही आनंदात जीवन जगत असतात. आईला वाटतं चला चांगलं होतय आयुष्यात, पण (हा पण खूप धोकदायक असतो) पुढे काही वेगळचं वाढून ठेवलेलं असतं. आईच्या नवऱ्याला हृदयविकाराचा तीव्र झटका येतो. मुलगा कामाचं निमित्त सांगून येण्याचं

टाळतो. शेवटी आईच नवऱ्याला दवाखान्यात भरती करते. त्याला बरं करण्यात तिची जीवनभराची जमापुंजी संपते. २-३ खोल्यांचे घर पण विकाव लागतं. कारण तिला नवरा महत्वाचा असतो. जीवनभराची साथ अशी अर्ध्यातच कशी बरं सोडू देईल! सर्व तो प्रयत्न करून ती नवऱ्याला वाचवते. नवरा वाचतो खरा पण तो अंथरुणाला खिळतो. भाड्याच्या घरात आईचा नवीन संसार चालू होतो, तीने सासूची सेवा केलेली असते तशी ती तहान भूक विसरून नवऱ्याची सेवा करत असते. नवऱ्याच्या तुटपुंज्या पेंशनवर घरदार चालत असतं.

नियतीला अजून काही वेगळचं मंजूर असतं. ६ महिन्यात नवरा मरण पावतो. आई विधवा होते, एकटा जीवनाचा आधार होता तो पण आईकडून हिरावून घेतला जातो. नवऱ्याची अंतिम तयारी सुरू असते. दोन्ही मुली ओक्साबोक्सी रडत असतात. मुलगा पण एका कोपऱ्यात रडत उभा असतो. अंतिम प्रेतयात्रा निघणार असते. बॅंड वाजत असतो. (काही गावात माणूस मेल्यानंतर त्याच्या अंतिम यात्रेत बॅंड वाजवतात.) गायक अत्यंत शोकाकुल वातावरणात अजून मन हेलावून टाकणारे गीत म्हणत असतो. गीताचे बोल असे असतात, **‘उड जाएंगा पंछि एक दिन, रहेगा पिंजरा खाली’**, हे ऐकून आणि अंतिम तयारी पाहून आईचा ताबा सुटतो. तिला नवऱ्यासोबत खूप बोलायचे असते, नवऱ्याला मिठीत घ्यायचे असते, पण नाईलाजस्तव हे शक्य नसते, तिचा नवरा ज्याने जन्मभर सोबत राहू असं वचन दिलेले असतं, तोच आईची साथ सोडून चालला गेलेला असतो. तिचे अश्रुसुद्धा कोरडे

झालेले असतात. बाहेरून शांत दिसणारी आई आतून पार कोलमडून गेलेली असते. तिचे मन सुन्न झालेले असते. ती देवाचा धावा करत असते, देवाला मागणे मागत असते माझ्या नवऱ्याला परत माझ्या जवळ पाठव, मी १६ सोमवार चे उपवास करेल, तुझ्या देवळात अनवाणी येईल, अजून काय काय विचारांचे काहूर तिच्या मनात माजलेलं असतं. तिला सभोवतालचे भान नसते. तिचा मुलगा केव्हाच्या हाका मारत असतो, तो आईला गदागदा हलवतो, आई भानावर येते. मुलगा विचारतो, 'घेऊन जाऊ का बाबाला?' आईचे भान हरपते तत्पूर्वी ती फक्त मान डोलावते. नवऱ्याची प्रेतयात्रा निघते. आई थोड्या वेळाने भानावर येते, बघते तर नवऱ्याचा मृत का होईना, देह समोर नसतो. आई खूप जीवघेणा आक्रोश करते. तिच्या मुली तिला सांभाळतात.

आई दुःखातून सावरते. मुलगा सर्वांसमक्ष आईची जबाबदारी घेतो. आई मुलाकडे राहयला जाते. आईचा पुढचा प्रवास सुरू होतो. देहाने थकलेली, कमरेतून झुकलेली, हातपाय थरथरणारी, सतत उदास राहणारी अशी आई मुलाकडे राहत असते. जेमतेम महिनाही उलटतं नाही हो तेवढ्यात सुनबाई भांडण उरकून काढते, 'आमच्यासाठी काय केलं?' सगळं लहान मुलाला, दोन्ही मुलींना देऊन टाकले आणि अजून बरेच काही. पोटचा मुलगा सुद्धा बायकोला गप्प करण्याऐवजी आईवरच सुटतो. भांडण वाढत जाते. नेहमीच कुरबुर होत असते. आईला मात्र काही सहन होत नाही आणि आई शेवटी कंटाळून सुनेच्या

कानाखाली आवाज काढते. हे पाहून आईचा मुलगा संतापतो, आईला शिवीगाळ करतो आणि आईला एका वृद्धाश्रमाच्या बाहेर आणून सोडतो.

आणि आईचा पुढचा प्रवास सुरू होतो, आई आणि वृद्धाश्रम...

मित्रहो, आईने आतापर्यंत सर्वांचं भलं केलेलं असतं, सासूबाईचा सांभाळ, लहान मुलाचा औषधोपचार, दोन्ही मुलींच्या सासरी आर्थिक मदत, नवऱ्याची देखभाल. एवढं सारं करून देखील आईच्या वाटेला वृद्धाश्रम का बरे आला असावा? मोठ्या मुलाची चुक नव्हे का ती?, का आईच्या गोड कष्टाचे फळ होत वृद्धाश्रम?.

आईवडिलांनी देखील पोटच्या मुलावर डोळे झाकून विश्वास न करता आपल्या सेवानिवृत्तीनंतरच्या काळात, आपला जीवन चरितार्थ भागवण्यासाठी ची सोय आधीच करून ठेवलेली बरे.. नाहीतर परत आहेच पुढचा जीवन प्रवास आई आणि वृद्धाश्रम किंवा वडील आणि वृद्धाश्रम...

(हे मुलांच्या बाबतीत सर्वांनाच लागू होईल असे नये. पण काही अश्या दुष्ट प्रवृत्तीच्या मुलांमुळे समाज जीवनावर वाईट परिणाम होतो.)

# जीवनातील व्यसन आणि वळण

मानवाने जन्म घेतल्यापासून ते त्याचा शेवट होईपर्यंत त्याला खूप सारी व्यसने लागतात. आपल्याला फक्त वाईट गोष्टींचेच व्यसन असते हे माहीत असते, पण नाही, खूप साऱ्या चांगल्या गोष्टी सुद्धा असतात जसे की वाचन करण्याचे व्यसन, चांगल्या संस्कारांचे व्यसन, मोठ्यांशी आदराने वागण्याचे व्यसन इत्यादी. माणसाला एखादं व्यसन लागलं तर त्याचे जीवन कसं वळण घेतं हे एका गोष्टरूपी पाहू.

एक होती कोमल. घरची परिस्थिती चांगली होती, दोन वेळ जेवायला चमचमीत पदार्थ, अंगात घालायला उच्च दर्जाचे भारी वस्त्र, थोडक्यात ऐश होती. जे मागेल त्याची पूर्तता बापाकडून होत होती. कोमल वयात येते. अकरावी शिकत असतानाच कोमलला बघायला एक मुलगा येतो. पेश्याने तो शिक्षक असतो. देखणा असतो. त्याच घरदार पण चांगलं असतं. उच्च पगार असतो. कुठलही व्यसन नसतं (हा फक्त सांगण्याचा विषय झाला), मुलाला कोमल पसंद पडते. साहजिकच सर्वांप्रमाणे कोमलला न विचारता तिचे लग्न ठरवून देण्यात येते. कोमलचा साखरपुडा होतो, त्यात अंगठी थोडी जोरात घातल्या गेल्याने कोमलचा होणारा नवरा संतापतो. कोमल घाबरुन माफी मागते. पण तिला कळून चुकलेलं असतं की नवरा तापट स्वभावाचा आहे. तरी ती त्याच्याशी लग्नाचं धाडस करते.

माहेरच्या घरी सर्व गोष्टींची रेलचेल असलेल्या अश्या कोमलचं तिचा बाप मोठ्या आनंदात, मोठ्या धुमधडाक्यात त्या मुलाशी लग्न लावून देतो. कोमलच्या मनात खूप साऱ्या शंकाकुशंकांचे काहूर माजलेले असताना कोमलचा लग्नसोहळा पार पडतो. नव्या घरी तिचं खूप आनंदाने स्वागत होतं. लहान सून असल्याकारणाने आणि घरी शेवटचा मोठा कार्यक्रम असल्याकारणाने तीचे खूप लाड होत असतात. तिला आपल्या घराची आठवण पण येत नाही एवढ्या लाडात सासूसासरे तिचे पालन करत असतात. माहेरच्या सारखीच सासरी ही सर्व गोष्टींची आबादान असते. पण लग्नाला जेमतेम ६ महिनेही ओलांडत नाही तोवर कोमलच्या नवऱ्याची बदली एका दूर असलेल्या गावात होते. तर त्यांना तिथं जाण्याशिवाय गत्यंतर नसते.

हुंड्यात मिळालेला सर्व सामान एका मोठ्या गाडीत भरून दोघेही जीवनाच्या पुढच्या प्रवासाला निघतात. नव्या गावाला पोहचतात. सामान लावून होतो. दोघेही खूप खुश असतात. त्या दिवशी ते बाहेरून जेवण मागवतात. जेवण झाल्यावर मस्त फिरायला जातात. कोमल जाम खुश असते. कारण तिला नवऱ्यासोबत वेळ घालवता येत असतो अगदी मनासारखा. पुढच्या दिवशी कामावरून परत येत असताना नवरा दारू पिऊन येतो. नवऱ्याचं नवीन रूप पाहून कोमल जाम घाबरते. कारण तिच्यासाठी हे सगळं नवीन असतं. ती जाब विचारते तर तिला उत्तर मिळतं की थोडीफार दारू पितो. ती मान्य करते, पण जसजसे दिवस जात असतात कोमलच्या नवऱ्याचं दारू पिण्याचं

प्रमाण खूप वाढते. कित्येकदा दारूच्या नशेत तिला मारहाण होते. पण हे सगळं ती मुकाट्याने सहन करत असते. अश्यातच ४-५ वर्षांचा कालावधी उलटतो. कोमलला मुलगा होतो, तेव्हा ती माहेरी असते. तिचा नवरा त्यांच्या मुलाला पाहायला येतो. तिथं परत तो सासऱ्यासोबत दारू पितो. तिथेच धिंगाणा घालतो. वाटेल तसे बोलतो, सासरच्या लोकांना शिवीगाळ करतो. हे सर्व पाहून कोमलचं मन खूप हेलावते. ती त्यांच्या घरी येते. काही दिवस ओलांडतात. तिचा नवरा परत दारू पिऊन येतो. या वेळेस तर तो कहर करतो. रात्री नशेत तिला मारहाण तर करतोच पण मध्यरात्री तो तिला घराबाहेर हाकलून लावतो. कोणाला सांगेल?, बापाला की हाच बाप जावयासोबत दारू पित बसलेला होता. असं म्हणून गप्प बसलेली कोमल रात्रभर बाहेर ओट्यावर बसून रडत असते, स्वतःला कोसत असते, 'काय म्हणून अश्या उच्च नोकरीवर असणाऱ्या, सासर चांगल्या असणाऱ्या, व्यसनाधीन माणसासोबत लग्न केलं?' रात्रभर तिच्या मनात फक्त आणि फक्त वाईट विचारांचं द्वंद्व चाललेलं असते. अश्यातच ती आत्महत्येचा मार्ग निवडते. आपल्या पोटच्या मुलाचाही विचार न करता, आपल्या पश्चात आपल्या परिवारावर काय वेळ येईल याचा तिला मागमूस ही नसताना कंटाळून ती तो निर्णय घेते. तिला फक्त नशेत तर्र असलेला आपला बेवडा नवरा, त्याची तिला झालेली शारीरिक मारहाण, मानसिक त्रास एवढचं दिसत असते. सकाळ होते. नवऱ्याची दारूची नशा उतरलेली असते, तो तिला आतमध्ये घेतो आणि हुकूम

सोडतो, ‘चहा बनव’. इकडे कोमल पार कोलमडून गेलेली असते. ती स्वयंपाक घरात जाते, एका कोपऱ्यात पडलेला घासलेटचा डब्बा उचलते, भराभर ते घासलेट अंगावर ओतून घेते, माचिसने काडी पेटवते आणि स्वतःला पेटवून घेते. ती जिवाच्या आकांताने ओरडत असते. नवरा ते दृश्य बघून पुरता हादरून जातो. ती त्याला शेवटचं म्हणून तश्याच पेटलेल्या अवस्थेत मिठी मारते, त्यात तो पण भाजला जातो. कोमल मरण पावते, तिचा नवरा वाचतो.

अशीच एक कथा आहे, कोमलची एक मैत्रीण असते, सुहासी नावाची. घरची परिस्थिती अगदी बेताची. तीचं एका सामान्य कुटुंबातील मुलाशी लग्न लावून दिले जाते. पण काही दिवसांनी त्या मुलाला नोकरी लागते. हाती पैसा दिसू लागतो. त्यांना २ अपत्ये होतात. संसार अगदी सुखात चालला असतो. असेच एका दिवशी सुहासीचा नवरा दारू पिऊन घरी येतो. सुहासी त्याला जाब विचारते, त्यावर तो म्हणतो मित्रांनी पार्टीत दारू पाजली, सुहासी खूप कडक शब्दात त्याला सांगते, त्याला ती विनंतीवजा धमकावते देखील, ‘यापुढे जर दारू पिऊन आलास तर मी घर सोडून चालली जाईल.’ यातून घ्यायचा तो बोध तिचा नवरा घेतो आणि नंतर दारूला स्पर्श देखील करत नाही. आणि दोघेही आनंदाने संसार करतात.

वरील दोन्ही गोष्टींवरून असे दिसून येते की, जीवन जगतांना कोणतीही परिस्थिती आली तर तिला सामोरे कसे जायचे. नवरा जरी

व्यसनाधीन झालेला असला तरी त्याला आत्महत्या हा पर्याय राहू शकत नाही. आपल्या जवळच्या व्यक्तीला आपणचं समजावू शकतो आणि करा ना प्रयत्न. एक सोडून हजारदा करा. शेवटी फळ मिळेलच...

जीवनात कठीण प्रसंगात सुद्धा कसे वळण घ्यायचे हे सर्वस्वी हे जीवन उपभोगणाऱ्याच्या हातात अवलंबून असते...

हताश झालेल्या माणसाने जर सुख देणाऱ्या व्यसनांचा अवलंब केला तर हे जीवन नक्कीच चांगलं वळण घेऊन त्या माणसाचा जन्म सार्थकी लावू शकते....

# जीवन गरीबाचं आणि लाइफ श्रीमंताची

जीवन जगत असतांना अनेक चढउतार येत असतात, अश्यातच मानव २ स्थिती अनुभवतो, एक म्हणजे गरीबीची आणि दुसरी म्हणजे श्रीमंतीची. ढोबळमानाने पाहिलं असता गरीब म्हणजे ज्याच्या जवळ पैसा नाही आणि श्रीमंत म्हणजे ज्याच्याजवळ भरमसाठ पैसा आहे. वास्तविक पाहता गरीब म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवू न शकणारा मनुष्य होय. उत्पन्नाच्या आधारे पाहिल्यास ज्याचे दरडोई उत्पन्न सरकारने ठरवून दिलेल्या दारिद्र्य रेषेखाली आहे असा मनुष्य गरीब आहे.

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याची मूठ झाकलेली असते म्हणजे त्याला खूप काही मिळवायचं असतं, तो त्या मुठीत जेवढं बसेल तेवढं मिळवण्याचा प्रयत्न करणार असतो आणि जेव्हा त्यास देवाज्ञा होते तेव्हा त्याची मूठ उघडी असते म्हणजे तो सोबत काहीच नाही घेऊन गेला. जे होतं ते सर्व इथेच भूतलावर सोडून गेला अगदी देह सुद्धा. हा तोच देह असतो ज्याला त्याचे रक्ताचे नातेवाईक लवकरात लवकर अंतिम संस्कार करून त्याची विल्हेवाट लावतात जेणेकरून

त्यांना संसर्ग होऊ नये आणि मानव हा, अश्या देहाचा त्यातील मनाचा विचार न करता सर्वत्र जीवनभर टेंभा मिरवत असतो. किती हास्यास्पद ना!

गरिबासाठी पैसा हेच जीवन आहे, तो दिवसरात्र मेहनत करून पैसा मिळवण्याचे साधन शोधत असतो. त्याच्यासाठी त्याचे नातेवाईक, त्याने मेहनत करून घेतलेल्या वस्तू हे जीवन असतं. त्याला इतरांबद्दल खूप आपुलकी असते, जिव्हाळा असतो. पण यात सगळयात वाईट जे काही असेल तर गरिबाला जेथपर्यंत त्याच्याजवळ पैसा नाही तेथपर्यंत साधं कुत्रं पण हुंगत नाही. पण श्रीमंताचं असं नसतं. त्याच्यासाठी वेळ म्हणजे जीवन असतं. तो वेळेचा पक्का असतो, त्याला वेळेचं महत्त्व माहीत असतं. वेळ पाळतो म्हणून सर्व काही असतं त्याच्या जवळ. पण त्याला नातेवाईक, मित्र यांबद्दल आदर नसतो. त्याला उच्चभ्रू लोकचं जवळचे वाटतात. तुच्छतेची भावना त्याच्या अंगी बळावलेली असते. हे सर्वच श्रीमंतांना लागू होईल असे नाही बरं. गरिबाजवळ पैसा आला तर तो चैनीच्या वस्तू आधी घेतो, ना की गुंतवणूक करतो. याउलट श्रीमंताचं आहे तो आधी गुंतवणूक करतो मग चैनीच्या वस्तूंकडे वळतो. गरिबाचं राहणीमान म्हणजे मिळेल ते नदीचं किंवा विहीरीचं पाणी, उरलेली शिळी भाकरी आणि त्याचं अंग झाकेलं जाईल असं वस्त्र. यात रात्रीचं उरलेलं सकाळी किंवा सकाळचं उरलेलं रात्री तो आनंदाने खातो कारण तो

परिस्थितीसमोर नतमस्तक असतो. त्याच्या २ वेळच्या जेवणाची ओढाताण असते. कमावणारा एकटा असतो आणि खाणारी तोंडे खूप सारी. वेळेप्रसंगी त्याला उपाशीपण झोपावं लागतं. याउलट श्रीमंतांचं. प्यायायला मिनरल वॉटर, खाण्यासाठी ब्रेड विथ एक्स्ट्रा लोडेड बटर, राहायला आलिशान घर असते. पण फॅशन म्हणून गरिबापेक्षाही फाटके वस्त्र परिधान करतात. गरिबाचे कपडे परिस्थितीमुळे फाटलेले असतात तर श्रीमंताचे कपडे फॅशन आयकॉन म्हणून फाटलेले असतात. अद्भुत ना! असेही जीवन असते.

गरिबाच्या हातात पैसा कमी असल्याकारणाने साहजिकच तो रेल्वेने प्रवास करतो. तो आजारी पडला की त्याच्या समोर फक्त सरकारी इस्पितळाचा पर्याय उभा ठाकतो. कोणत्याही प्रकारचं काम असलं की त्याला लांबलचक रांगेमध्ये ताटकळत उभ राहावे लागतं. कारण एकच असतं, ते म्हणजे गरीबाचं स्टेटस खूप खाली असते, हाती पैसा नसतो. याउलट श्रीमंतांचं असते. वेळेला महत्त्व दिल्यामुळे हाती बक्कळ पैसा असतो. तर वेळेची बचत करण्यासाठी समोर खूप सारे पर्याय उपलब्ध असतात. प्रवासाला विमान, आजारी पडला की लवकर बर होण्यासाठी सर्व सोईंनी युक्त असे खासगी इस्पितळे, काम लवकर व्हावे म्हणून व्हीआयपी पास किंवा व्हीआयपी सुविधा इ. गोष्टी श्रीमंत उपभोगतात.

गरीब म्हणून जन्माला येणे हे आपल्या हातात नसतं, पण गरीब म्हणून परिस्थितीला दोष देत मरण पावणे याला सर्वस्वी आपणचं जबाबदार असतो. आपल्या हातात बक्कळ पैसा आल्यास, त्याचा गर्व न करता सदैव इतरांसाठी मदतीस तत्पर असणे, मनाचा मोठेपणा दाखवून गरिबीच्या दाढेत अडकलेल्यांना त्यातून बाहेर काढणे हीच खरी श्रीमंती म्हणता येईल.

# प्रेम : तारतं की मारतं

प्रेम म्हणजे काय?

ह्या भूतलावरची सर्वात मौल्यवान आणि सर्वात किंमती गोष्ट म्हणजे प्रेम आहे. प्रेम ही एक अशी भावना आहे ज्यात आपल्याला समोरील व्यक्ती किंवा वस्तू याबद्दल खूप आदर, खूप काळजी असते, आपण त्यांना जिवापाड जपत असतो, त्यांच्या दूर जाण्याच्या साध्या कल्पनेने जीव कासावीस होतो. समोरील व्यक्ती आपल्यापासून दुखावली न जाता जास्तीत जास्त आनंदी कशी असेल या निस्सीम भावनेने त्या व्यक्तीची केलेली सेवा म्हणजे प्रेम होय. "रिकामा खिसा, उपाशी पोट आणि प्रेमाची भूक माणसाला खूप काही सांगून जाते. एकतर तो काही तरी भल्याचं करतो किंवा काही तरी भलतचं करतो."

प्रेमाची वेल ही विश्वासरूपी आधारावर वाढत असते. ज्या दिवशी हा आधार म्हणजेच विश्वास डगमगायला लागतो त्या वेळेस प्रेमाचा वेल देखील हेलपाटे खायला लागतो. असा हा डोळे झाकून अथांग समुद्ररूपी केलेला विश्वास आणि बदल्यात कोणत्याही गोष्टीची हाव न बाळगता निर्माण झालेली भावना, तिलाच प्रेम म्हणतात. प्रेम व्यक्त करण्याच्या खूप पद्धती आहेत. "माझं तुझ्यावर किंवा तुमच्यावर प्रेम आहे" फक्त असे बोलून प्रेम व्यक्त नाही होत तर त्यासाठी तसं वागावं लागते, समोरच्या व्यक्तीच्या मनात आधी जागा बनवावी

लागते आणि त्या जागेवरचा आपला हक्क आपल्याला नेहमी आपल्या कृतीतून दर्शवावा लागतो.

प्रेम फक्त प्रियकर आणि प्रेयसी यांच्यातच नसते. आजकालच्या सिनेमांनी आणि सोशल मीडियाने याचा उगाच बाऊ केलाय. त्यामुळे खूप जणांचे आयुष्य बर्बाद होत आहे, खूप जण त्याचे अनुकरण करत तसे वागायला बघत आहेत. प्रेम खूप बाबतीतून दर्शवता येते. आई वडिलांचे आपल्या लाडक्या मुलांवर, मुलांचे आपल्या पालकांवर, एका सजीवाचं दुसऱ्या सजीवावर, माणसांचे मुक्या जिवावर म्हणजेच प्राण्यांवर, विद्यार्थ्यांचे पुस्तकांवर, आपापल्या क्षेत्रात काम करणाऱ्यांचे आपल्या कामावर असे प्रेम असलेल्यांचे खूप काही उदाहरणे आहेत. पण आजच्या युगात घडणाऱ्या वाईट गोष्टींमुळे हे निखळ असेलेलं प्रेम बदनाम होत आहे.

ही एक गोष्ट आहे राजा आणि राणीची. असेल वय २१-२२ वर्षे दोघांचेही. राजा खालच्या जातीतला (माणसाने आपल्या कार्यानुसार वर्गीकरण केलेल्या जाती) आणि राणी उच्च जातीतील. दोघांना भेटून फारच कमी वेळ लोटलेला असतो. दोघांना एकमेकांबद्दल मानसिक आणि शारीरिक ओढ असते ज्याला ते प्रेम म्हणतात. काही दिवस मजेत जातात, राणीला दूसरा उच्च वर्णीय, तिचा खर्च सांभाळणारा असा मुलगा भेटतो आणि ती त्या सोबत राजाला एकटं सोडून, राजा पोहचू शकणार नाही इतक्या दूर निघून जाते. तिकडे राणी त्या मुलासोबत आनंदात जीवन जगत असते. पण इकडे राजा

तिच्या आठवणीत इतका मग्न झालेला असतो की त्याला कशाचीही पर्वा नसते. खूप काही संधी देणारं आयुष्य समोरून आर्त हाका मारत असतं, तरी हा राजा तिच्या आठवणी विसरण्यासाठी दारू, सिगारेट सारख्या व्यसनाच्या आहारी जातो. त्याला आईवडील, मित्रमैत्रिणी समजावून समजावून थकतात पण तो एक काडीचही ऐकत नाही आणि असे करत करत तो आत्महत्येचा विचार करतो. आई वडील, भाऊबहीण, मित्रमैत्रिणी आणि आपल्या संपूर्ण जीवनाची कारकीर्द यांचा विचार न करता राजा त्या राणीच्या विरहात फास घेतो आणि पुढच्या जीवनास मुकतो.

अशीच एक गोष्ट आहे बबी आणि बब्याची. दोघेही उच्चशिक्षित, सामाजिक भान ठेवणारे, एका चांगल्या कंपनीत काम करणारे, दोघांचा एकमेकावर खूप जीव. बब्याला भविष्याची चिंता लागलेली असते, त्याला वाटते बबी त्याला सोडून चालली जाईल. तो सतत चिंतातुर असतो. त्याला बबी विचारते, 'काय झालं आहे?' तो तिला त्याची मनाची चाललेली घालमेल सांगतो. त्यावर बबीचं उत्तर ऐकून तो एकदम निश्चिंत होतो. बबी त्याला एक छोटीशी कथा सांगते, "एक मुलगा असतो त्याच्याजवळ एक पक्षी असतो. त्या पक्ष्यावर त्या मुलाचं खूप प्रेम असते. एकदा तो पक्षी उडून जातो आणि त्यामुळे तो मुलगा खूप उदास होतो, अन्नपाणी त्यागतो. हा सर्व प्रकार त्याचे वडील पाहत असतात. ते त्या मुलाला जवळ घेऊन सांगतात की, 'जर त्या पक्षाला तुझा लळा असेल तर तो परत येईल आणि जर नसेल तर नाही

येणार. तो परत नाही आला तर समज की तो तुझा नव्हता' आणि खरचं तो पक्षी परत येतो आणि तो मुलगा खुश होतो". यातून काय समजायचं ते बब्या समजला आणि कुठलेही विचार मनात नं ठेवता पुढच्या मार्गाला लागला. त्यांची मानवनिर्मित जात वेगळी असून सुद्धा त्यांचं लग्न होते आणि ते दोघेही सुखाने संसार करतात.

या वरील दोन्ही गोष्टींचं तात्पर्य असे की तुमचं नातं तुमच्या विश्वासाच्या, तुमच्या प्रेमावर अवलंबून असते. पहिल्या राजाराणीच्या गोष्टीत प्रेम नसून फक्त आकर्षण असून त्याचे ९५% अनुकरण होते आणि त्यामुळे सभोवतालचे लोक ते मान्य करत नाही. दुसऱ्या बबीबब्याच्या गोष्टीत प्रेम निखळ असूनसुद्धा फक्त ५% अनुकरण होते आणि त्यांचं नाते आयुष्यभर टिकते.

प्रेमात जर विश्वासाचा समतोल असेल तर चिरकाळ टिकून ते प्रेम पारदर्शी बनते. आणि जर त्यात विश्वासाचा असमतोल असेल तर ते लवकर माघार घेते. योग्य वेळी योग्य व्यक्ती किंवा वस्तूवर केलेलं प्रेम असेल तर ते नेहमी त्या प्रेम करणाऱ्याला तारतं आणि याउलट जर अयोग्य व्यक्ती किंवा वस्तूवर अयोग्य वेळी प्रेम केलं तर काही गोष्टीच्या अभावापायी असे प्रेम हे प्रेम करणाऱ्याला तारण्याऐवजी मारतं.

आता तुम्हीच ठरवा की कसे प्रेम करायचे कारण प्रेम दोन्ही गोष्टी करते.

प्रेम तारतं किंवा मारतं...

# जीवन आणि बिछाना

**बिछाना** म्हणजे काय?

बिछाना हे एक असे साधन आहे ज्याच्या मदतीने माणूस शारीरिक श्रम कमी करण्याच्या उद्देशाने त्यावर आराम करून आपले श्रम शमवतो.

माणसाचा जन्म आणि मृत्यू या दोन्ही गोष्टी बिछान्याशी संबंधित आहेत. माणूस जन्माला आला तर पाळणा हा त्याचा बिछाना होतो आणि मरण पावल्यास स्मशानातील लाकडे हे त्याचा बिछाना होतात. माणसाचा पूर्ण जीवनक्रम लक्षात घेता त्याचं अर्ध्याहून जास्त आयुष्य बिछान्यावर व्यतीत होते. एकट्या माणसाच्या साथीला हा बिछाना असतो जो त्याची शेवटपर्यंत साथ देतो अगदी मेल्यानंतरसुद्धा. उद्याच्या भविष्याचा केलेला विचार असो, येणाऱ्या सुखाची रंगवलेली स्वप्ने असो, आजचा दिवस खराब गेला, पोटाला अन्नाचा कण देखील नाही लाभला यामुळे गळालेली आसवे असो, आपल्या जोडीदारासोबत तासंतास केलेल्या गप्पा असो, आजी आजोबांकडून ऐकलेल्या गोष्टी असो, थकून आल्यावर, डोक दुखत असताना आई वा बायकोने डोक्याची केलेली मालीश असो... या सर्व गोष्टींना एकच जण साक्ष असतो आणि तो म्हणजे बिछाना...

प्रत्येकालाच एकसारखा बिछाना लाभेल याची शाश्वती जरा कमीच आहे कारण जो जसे कर्म करतो त्याला तसे फळ मिळते. बघा ना श्रीमंत लोकांना झोपायला “स्लीपवेल” ची जास्त आरामदायी गादी असते, तर गरिबाकडे पाठ टेकवण्यापुरती जीर्ण झालेली, मध्ये खूप सारे खड्डे असलेली काळया कापसाची गादी असते. काहींच्या नशिबी तर गादी पण नसते, बिचारे खाली एखादी गोधडी अंथरूण गुजराण करत असतात. काही वेळा परिस्थिती एवढी बिकट असते, तेव्हा रुमालाची घडी डोक्याखाली ठेऊन पण झोपावे लागते. तर काही वेळा शेणाने सारवलेली जमीन माणसाचा बिछाना बनते.

काही अजून आरामदायी बिछान्याकडे पाहिलं असता पहिल्या क्रमांकावर येते आई ची कुशी. जन्म होताच बाळाचा बिछाना बनतो तो आईची कुशी, ज्यात त्याला केलेलं स्तनपान असेल, त्याला ह्या जगाची करून दिलेली ओळख असेल, त्याला अ आ करत करत शिकवलेला आई हा शब्द असेल, त्याला थापटून थापटून छान झोपवलेलं असेल, अश्या आईच्या कुशीपासून तो लहानाचा मोठा होतो आणि मोठा झाल्यावर आपल्या जन्मदात्या आईला विचारतो, तू माझ्यासाठी काय केलं?... आजी तेल लावून, मालीश करून बाळाची आंघोळ करते तर आजीचे पाय बाळाचा बिछाना होतात. त्या बिछान्यावर मस्त राजकुमारासारखं सुख घेत हसत रडत बाळ मोठं होतं. आई घरी नसताना मोठ्या बहिणीची कुशी, ज्यात ती खूप लाडाने सांभाळते, हा पण बिछाना असतो. बागेत सायंकाळी वर्दळ नसताना

प्रेयसीच्या कुशीत डोक ठेवून तासंतास केलेल्या गप्पा असोत किंवा लग्न झाल्यावर बायकोच्या कुशीत डोक ठेऊन संसाररूपी पाहिलेली स्वप्न असोत हे देखील बिछान्याचं काम करतात.

माणूस मेल्यानंतर त्याला तिरडीवर घेउन जातात हा त्याचा अंतिम प्रवासाचा बिछाना असतो आणि स्मशानात पोहचल्या नंतर लाकडे आणि शेणाच्या गोवऱ्या यांची रचलेली चिता हा या लोभी माणसाचा ह्या मानव जन्मातील अंतिम बिछाना असतो. आजकाल तर ते देखील नशिबात नसते. इलेक्ट्रोनिक स्मशानात फक्त आत टाकून देतात झाले अंतिम संस्कार. कधीकाळी मऊ मऊ, नरम गादीवर चादर ओढून झोपणारा माणूस शेवटी लाकडाच्या बिछान्यावर शेणाच्या गोवरीरूपी चादर ओढून आगीचे घाव सोसत, फक्त आणि फक्त आठवणी मागे सोडत, जगाचा निरोप घेतो.

मूठभर हाडे कुठेही टाकायची ह्या उद्देशाने शारीरिक श्रम कमी करण्यासाठी मिळेल तेवढ्या जागेत केलेला आराम आणि उद्या परत जोमाने कामासाठी हजर असे बहुतेक लोक करत असतात. यात त्यांना बिछानाच कामास येतो. अंथरूण पाहून पाय पसरावे याचा प्रत्यय माणसाला नेहमी येत असतो. हाती पैसा नाही म्हणून राब-राब राबणारा माणूस शांततेने आणि सुखाने झोपतो या वेळेस बिछाना कसाही असो. तेच हाती बक्कळ पैसा असलेला माणूस झोपेच्या गोळ्या घेऊन आरामदायी बिछान्यावर झोपतो. किती आश्चर्याची गोष्ट आहे बरे!

असा हा माणसाच्या प्रत्येक सुख दुःखाला साक्ष असणारा, माणसाची मरणानंतरही साथ न सोडणारा खूप दुर्लक्षित मित्र म्हणजे बिछाना....

# जन्माचा जल्लोष आणि मृत्युचा आक्रोश

माणसाला सर्वात जास्त आनंद केव्हा होतो? तर घरात एखादं बाळ जन्माला येतं तेव्हा आणि माणसाला सर्वात जास्त दुःख केव्हा होते? तर एखाद्या जवळच्या व्यक्तीचा मृत्यू होतो तेव्हा. माणूस सर्वात जास्त कोणाला घाबरतो? तर मरणाच्या साध्या कल्पनेला. काही बहादर मरायला पण नाही घाबरत, खुशाल जीव देऊन मोकळे होतात.

**जन्माचा जल्लोष का?**

जेव्हा एखाद्या कुटुंबात बाळ जन्माला येणार असते तेव्हा त्या घरात एक नवचैतन्य निर्माण होऊन घरात उत्साहाचे वातावरण पसरणार असते. आजी आजोबा यांना आपल्या मुलांचं बालपण पुन्हा एकदा नातवंडांच्या रूपात अनुभवायला मिळणार असतं, त्यात त्यांना म्हातारपणी एक नवा मित्र भेटणार असतो, आपल्या जीवनाचे सर्व सुखद अनुभव ते त्या नातवंडाला संस्काररूपी देणार असतात तर त्यांचा आनंद वेगळाच असतो. आपण पहिल्यांदा आईवडील होणार असे म्हणून त्या नव्या जोडप्याला आभाळ ठेंगणे होणार असते, आपण

आपल्या मुलाला असं शिकवू, असे कपडे घेऊ, असे संस्कार देऊ हे सारं खूप आधीच ठरलेलं असतं ते फक्त सत्यात उतरणार असते. बाकी परिवारातील सदस्यांना सुद्धा आपल्या घरी नवीन पाहुण्याचं आगमन होणार याची जाम उत्सुकता लागलेली असते आणि सगळयात महत्वाचं म्हणजे ते बाळ पहिल्यांदा हे जग बघणार असते, हे सर्व अनुभवणार असते म्हणून त्याच्या स्वागतासाठी असतो जन्माचा जल्लोष...

कसलंही ज्ञान नसलेलं हे बाळ पहिले २-३ वर्षं फक्त निरीक्षणातून शिकत असते. नंतर उच्चार आणि अक्षर ओळख झाल्यावर त्यात अजून गोष्टी आत्मसात करण्याची क्षमता निर्माण होते. अश्या चांगल्या वातावरणात शिकलेला, वाढलेला मुलगा मोठा होऊन आपल्या आईवडिलांच्या म्हातारपणाची काठी म्हणजे आधारस्तंभ होणार असतो, देशाच्या कार्यात योगदान देऊन स्वःताचा गुजराण करणार असतो. म्हणून या सर्व गोष्टी घडून येण्यासाठी जन्माचा जल्लोष असतो.

अश्या जल्लोषात एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे आणि ती म्हणजे जन्माला आलेल मूल हे एका मातीच्या गोळ्याप्रमाणे असते त्याला जसा आकार देऊ तसा तो आकार घेत असतो. त्याला लहानपणापासूनच जर चांगल्या गोष्टींची ओढ लावली तर तो मोठेपणी उच्चशिक्षित, सुज्ञ नागरिक होऊन समाज घडवण्यात मदत करेल आणि

जर वाईट गोष्टींचा त्यावर प्रभाव पडला तर तो मोठेपणी चोऱ्या, खून, बलात्कार सारखी कुकर्मे करून समाज बिघडवण्यात हातभार लावेल.

## मृत्युचा आक्रोश का?

"मृत्यू" साधं नाव पण काढलं तरी खूप जणांच्या अंगावर काटा उभा राहतो. साहजिकच आहे कारण ह्या मानव जन्माचा शेवट होणार असतो. राब-राब राबून उभ्या केलेल्या आपल्या साम्राज्याला आपण मुकणार असतो, आपल्या प्रियजनांचा सहवास लाभणार नसतो, पुढचा प्रवास माहीत नसतो, भावनिक आधाराला तडा जाणार असतो, मेल्यानंतर ज्या देहावर आपण जिवापाड प्रेम केलं त्याची साथ सुटणार असते, शेवटचे डोळे मिटल्यानंतर ह्या सुंदर अश्या जगाचा, सभोवतालच्या भौतिक गोष्टींचा, आपल्या जवळच्या प्रिय लोकांचा संपर्क तुटणार असतो म्हणून मरणाऱ्याच्या मनात मृत्युचा आक्रोश चालू असतो.

राहिला प्रश्न १०-१२ दिवस रडणारे यांचा तर ते आपल्या जवळच्या व्यक्तीला गमावणार असतात, आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांची ओढाताण होणार असते, उद्याचा दिवस कसा जाईल या विवंचनेत असणाऱ्यांचा आजचा दिवसपण व्यर्थ झालेला असतो, दररोज डोळ्यासमोर असणारी व्यक्ती नाहीशी होणार असते, उद्यापासून

ते एका खास व्यक्तिला मुकणार असतात म्हणून इतर लोकांचा मृत्यूबाबत आक्रोश चालू असतो.

मृत्यूचे प्रकार आहेत, जसे की आत्महत्या, नैसर्गिक मृत्यू, अपघाती निधन, हृदयविकाराचा झटका, खून इत्यादी. जे लोकं आजच्या जीवनात आलेल्या संकटांना घाबरून त्याचा सामना न करू शकल्यामुळे आत्महत्येचा पर्याय निवडतात आणि हे मानवी जीवन संपवतात. हे लोकं खूप भ्याळ, खूप घाबरट, खूप कमजोर असतात. ज्याला कोणाला असा विचार येत असेल ना त्याने आपला आधीचा जीवनप्रवास आठवावा आणि एक गोष्ट कायम लक्षात ठेवावी की ह्या जगात प्रत्येक समस्येचं समाधान, त्याचा उपाय उपलब्ध आहे, गरज आहे फक्त तो उपाय शोधण्याची. काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक इतरांचा जीवन जगण्याचा हक्क त्याचा खून करून हिरावून घेतात. जरी मृत्युचे खूप सारे पर्याय डोळ्यासमोर असले तरी हा मृत्यू खूप त्रासदायक असतो.

एखाद्या चांगल्या कर्म केलेल्या माणसाचा मृत्यू झाल्यास त्याचा मृत्यू समाजाची झालेली हानी असे म्हणतात आणि तो मनुष्य सदैव बाकी लोकांच्या स्मरणात असतो. याउलट एखाद्या दुष्कृत्ये केलेल्या माणसाचा मृत्यू झाल्यास तो ह्या समाजावर ओझं होता असं म्हणून बरे झालं असे म्हणतात.

जन्म आणि मृत्यू आपल्या हातात नसतो, पण त्या दोघांमधला काळ हा आपल्या हातात असतो आणि तो कसा व्यतीत करायचा यावर आपलं संपूर्ण जीवनाचा सार ठरलेला असतो.

जल्लोष आनंदाची तर आक्रोश दुःखाची मात्रा स्पष्ट करतो. असा तीव्रता खूप जास्त असलेला असतो जन्माचा जल्लोष आणि मृत्युचा आक्रोश...

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

